भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

जा.क्र. ८२५/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/१२/२०१७

**१) अल्पवयीन मुले बाल गृह येथुन निघुन गेल्याने गुन्हा नोंद . :**

दिनांक ०४/१२/२०१७ चे ०५.३० वाजता दरम्यान यातील सेवंताबाई समृती बाल गृह तुमसर येथुन दिनांक ४/१२/१७ चे ०५.३० वा. कोणालाही न सांगता १) अजमेश केशव सेलोकर वय १६ वर्ष, रा. एकलारी २) राजअंकी वय १३ वर्ष, रा. गोदिंया हे पळुन गेले अश्या फिर्यादी अनिल रामदेव मेश्राम वय ५० वर्ष, रा. दुर्गा नगर तुमसर यांच्या लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन तुमसर येथे कलम ३६३ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. शहारे पोलीस स्टेशन तुमसर हे करीत आहेत.

**२) ट्रक चालकांच्या धडकेत मोटार सायकल चालकांचा मृत्यु . :-**

दिनांक २२/१२/२०१७ चे १८.३० वाजता दरम्यान यातील मृतक संजय मन्साराम मिसाळ वय ३२ वर्ष, रा. पिंपळगाव (भो) जि. चंद्रपुर हा त्याचे मोटार सायकल क्र. एमएच ३४ एच ३३५० ने डांबरीविरली येथुन पिंपळगाव येथे जात असतांना वडसा ते लाखांदुर रोडवरील चपराड जवळ विरुध्द येणाऱ्या यातील आरोपी ट्रक चालाकाने त्याचे ताब्यातील वाहन हयगयीने, लापरवाहीने चालवुन मृतकचे मोटार सायकलला धडक दिल्याने मृतक हा जागीच मरण पावला व ट्रक चालक हा वाहनासह पळुन गेल्याने फिर्यादी राष्ट्रपाल महादेव दोनाडकर वय ४७ वर्ष, रा. डांबेविरली यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४(अ) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. मंडलवार पोलीस स्टेशन लाखांदुर हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**३) अज्ञात ट्रक चालकांच्या निष्काळजीपणामुळे एकाचा मृत्यु . :-**

दिनांक २२/१२/२०१७ चे २०.१५ वाजता दरम्यान यातील फिर्यादी मंगेश मारोती मडावी वय २२ वर्ष, रा. संत कबीर वार्ड भंडारा हा व त्याचा मित्र मृतक राहुल आगडे वय २४ वर्ष, रा. संत कबीर वार्ड भंडारा याचेसह मोटार सायकल क्र. एमएच ३६ जे १३९६ हिरो होंडा स्पेलन्डरने वरठी वरुन भंडारा कडे जात असतांना मृतकचे मोटार सायकलला वरठी कडुन भंडारा कडे जाणाऱ्या यातील अज्ञात ट्रक चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपने चालवुन ट्रक चा मागील भाग मोटार सायकलला लागल्याने फिर्यादी हे खाली पडले व ट्रक चालकाने ट्रक मागे घेतल्याने मृतकचे डोक्यावरुन ट्रक चा चाक गेल्याने मृतक हा जागीच मरण पावला व ट्रक चालक याने आपले ट्रक पळवुन नेल्याने फिर्यादी मंगेश मारोती मडावी वय २२ वर्ष, रा. संत कबीर वार्ड भंडारा यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन वरठी येथे कलम २७९,३०४(अ) भादवी. सहकलम १८४,१३४(अ) मोवाका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोनी. मंडलवार पोलीस स्टेशन वरठी हे करीत आहेत.

**४) मोटार सायकल चालकांच्या धडकेत पायी चालक जखमी . :—**

दिनांक २२/१२/२०१७ चे १४.०० वाजता दरम्यान यातील जखमी फिर्यादी मुन्ना श्रावण सुखदेवे वय ३४ वर्ष, रा. सुरेवाडा हा मेनरोड बस स्थानक कडुन गांधी चौक कडे पायी येत असतांना यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील मोटार सायकल ही हयगयीने, लापरवाहीने चालवुन फिर्यादीला बयान व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३७७ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. चेके पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

**५) बिनापास परवाना अवैध रित्या जनावरांची वाहतुक करतांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २२/१२/२०१७ चे ०३.०० वाजता दरम्यान यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील टाटा झेनॉन पिकअप डाल्या मध्ये अवैधरित्या १ मोठा निळा बैल, १ पांढरा बैल, २ पांढऱ्या रंगाचे गोरे, २ लालसर रंगाच्या गोऱ्या, १ लाल रंगाचा लहान गोरा, १ काळी जर्सी गाय, असे एकुण ८ जनावरे एकुण किंमती ४४,०००/—रु. चा माल कोंबुन, डांबुन त्यांना निदर्यतेने वागणुक देवुन सोबत्यासह बिनापास परवाना वाहतुक करतांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. सिंगाडे यांचे तोंडी रिपोर्ट पोलीस स्टेशन साकोली येथे कलम २७९ भादवी. सहकलम ११(१)(ड)प्रा.णी.वा.का. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. सिंधीमेश्राम पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

**६) जळाल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :—**

दिनांक १९/१२/२०१७ चे ०५.०० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमती शालु चंद्रशेखर बागडे वय ३६ वर्ष, रा. फुलमोगरा ही दिनांक १९/१२/२०१७ चे सकाळी ०५.०० वाजता दरम्यान तिचे राहते घरी कामावर जाण्यासाठी चुल पेटवुन घरात जात असतांना नेसलेल्या साडीला पेटता दिवा लागल्याने साडी जळुन ती स्वत: जळाल्याने तीला औषधोपचारा करीता मेडीकल कॉलेज नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पा. स्टे. अजनी नागपुर येथे मर्ग क्र. ००/१७ क. १७४ जाफौ. चे कागदपत्र प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. लांजेवार यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. साखरे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**७) वैनगंगा नदीचे पात्रात युवकाचा मृत्यु . :—**

दिनांक २२/१२/२०१७ चे १३.०६ वाजता दरम्यान यातील मृतक पवन भगीरथ पाऊलझगडे वय २२ वर्ष, रा. रा. वासेरा दिनांक २२/१२/१७ ला वैनगंगा नदीचे पात्रात सकाळी ८.३० वा मृत अवस्थेत मिळुन आल्याने फिर्यादी सौ. सार्थीका संजय गजभिये वय ४५ वर्ष, रा. आजीमाबाद यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पो.स्टे. कारधा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मनगटे पो.स्टे. कारधा हे करीत आहेत.

**८) आमरोड वर येणा—या जाणा—या वाहतुकीस व लोकांच्या जिवितास धोका निर्माण होईल अशा स्थितीत वाहन उभी करून मिळून आल्याने गुन्हा नोंद :—**

दिनांक २२/१२/२०१७ चे १८.४५ वाजता दरम्यान यातील आरोपी चालकाने त्याचे ताब्यातील बोलरो मॅक्स वाहन आमरोडवर येणा—या जाणा—या वाहुतुकीस व लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अशा स्थितीत ऊभी करून मिळुन आल्याने सर तर्फे फिर्यादी पोना. तिवाडे यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २८३ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. तिवाडे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

९) अवैध दारु अड्डयांवर धाडी . :–

दिनांक २२/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोलीस स्टेशन भंडारा, कारधा, वरठी,सिहोरा व लाखांदुर येथे अवैध दारू अड्डयांवर धाडी घालुन एकुण ०५ गुन्हे दाखल करून आरोपीतांच्या ताब्यातुन ३० लिटर हातभट्टी दारू किंमती २,०००/–रु. व ३ लिटर ६९० मिली लिटर देशी दारु किंमती ११९८/–रु. असा एकुण ३१९८/रु. चा माल जप्त करण्यात आला.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २२/१२/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ७१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती– ०७ केसेस व ईतर वाहनांवरती –६४ केसेस करण्यात आलेले आहे.

23.12

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.